दिनांक १०/०२/२०२२

# प्रसिध्दी पत्रक

**आलोसे श्री. रामदास हनुमंतराव लोहकरे, वय 55 वर्ष धंदा- नौकरी, स्वच्छता निरीक्षक, ग्रामीण रुग्णालय आणि प्रशिक्षण केंद्र पैठण, रा. घाटी दवाखाना क्वॉर्टर क्रं. सी-12 औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये 10000/लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे पैठण शहर ओरंगाबाद ग्रामीण येथे येथे गु.र.नं. 10/2022 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | आलोसे श्री. रामदास हनुमंतराव लोहकरे, वय 55 वर्ष धंदा- नौकरी, स्वच्छता निरीक्षक, ग्रामीण रुग्णालय आणि प्रशिक्षण केंद्र पैठण, रा. घाटी दवाखाना क्वॉर्टर क्रं. सी-12 औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 26000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 10000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. रुपचंद वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचा दोन महिण्याचा कंत्राटी कामाचा पगार काढण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचा व त्यांचा मुलगा यांनी पैठण येथील सरकारी दवाखाण्यातील माहे ऑक्टोंबर व नोव्हेंबर या महिण्यांचा कंत्राटी कामाचा पगार काढण्याकरिता श्री. लोहकरे यांनी तक्रारदार यांना रुपये 26000/- लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **श्री लोहकरे** यांनी तक्रारदार यांच्याकडे 26000/- रुपयाची मागणी केली. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री. रामदास लोहकरे यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडी अंती लाचेची रक्कम रुपये 10,000/- स्विकारल्यानंतर आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पैठण शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गु.र.नं. 10/2022 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. रुपचंद वाघमारे यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- दिगांबर पाठक, भिमराव जिवडे, पोअं. विलास चव्हाण यांनी मदत केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**


**संपर्क पत्ता** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद**

**ई- मेल** :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- **acbmaharashtra.net**

**संपर्क क्रं.** :- **0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,**

**पोलीस अधीक्षक** :- **8888807299**

**अपर पोलीस अधीक्षक** :- **8788644994**


**(स्वाक्षरीत)**
**पोलीस उप अधिक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद.**

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते